जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2018
पुढारी

# आत्मविश्वासाच्या बळावर उद्योगातील अडचणींवर मात शक्य

## प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रचंड इच्छाशक्ती व आत्मविश्वासाच्या जोरावर उद्योग, व्यवसायात येणाऱ्या अडचणींवर मात करणे शक्य असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र, मध्यवर्ती प्लेसमेंट सेल आणि शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित उद्योजकता विकास कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी स्टार्टअप तज्ज्ञ सचिन कुंभोज यांची प्रमुख उपस्थित होती.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कुशल उद्योजक होण्यासाठी प्रामाणिकपणे कष्ट करण्याची तयारी आणि कामात सातत्य राखणे आवश्यक आहे. यशस्वी उद्योजक प्रथम छोट्या-छोट्या व्यवसायाने सुरुवात करतात. त्यानंतर अनुभव आणि मेहनतीच्या जोरावर व्यवसायवृद्धी करतात. आजचा टेक्नोसॅव्ही तरुण एका क्लिकवर उद्योगांची माहिती उपलब्ध करू शकतो. त्याचा उपयोग आपल्या ज्ञानवृद्धीबरोबरच समाजाच्या प्रगतीसाठी करणे आवश्यक आहे. यशस्वी होण्यासाठी स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करावा लागतो, तो कोठेही विकत मिळत नाही. कष्टाच्या तयारीपुढे कोणत्याही नव-उद्योजकास पैशाची अडचण भासत नाही. यशस्वी उद्योजक होण्यासाठी योग्य नियोजनाबरोबरच प्रचंड कष्टाची आवश्यकता असते. मेहनतीमध्ये सातत्य आणि वेळोवेळी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. एस. राशिनकर यांनी आभार मानले.

जनसपर्क कक्ष
24 FEB 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या शिवमहोत्सव

## बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांची मिळणार मेजवानी



**कोल्हापूर : शिवमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीस अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात रविवार (२५) रोजी शिवमहोत्सवाचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठ आजी माजी विद्यार्थी कृती समिती व स्पेक्ट्रम ॲकॅडमी (नाशिक), कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे संकल्पक डॉ. प्रवीण कोडोलीकर व आयोजक समितीचे सचिव डॉ. चांगदेव बंडगर यांनी दिली.

उद्घाटनानंतर शिवपुरस्कार वितरण व भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. दरम्यान फिल्मफेअर अवॉर्ड विजेता लघुपट 'अनाईत' याचेही सादरीकरण करण्यात येणार आहे.

**शिवाजी परूळेकर यांना 'जीवन गौरव पुरस्कार'**

शिवाजी विद्यापीठात आजी माजी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने 'जीवन गौरव पुरस्कार' शिवाजीराव परूळेकर यांना देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे यंदा पोलीस अधिकारी अभिजित भोसले यांना त्यांच्या गायन कलेसाठी शिव-कलागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

शिक्षकेत्तर, प्रशासकीय सेवकांना शिव-पुरस्कार देण्यात येणार आहे. यंदाच्या या पुरस्काराचे मानकरी कॅप्टन डॉ. नितीन सोनजे, डॉ.नंदकुमार मोरे, संदीप पाटील, विजय पाटील, सदानंद माने, मिलिंद सुरूलकर व रवींद्र भोसले यांचा समावेश आहे.

24 FEB 2018
पुढारी
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रविवारी शिवमहोत्सव

## शिवपुरस्कार वितरण समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आजी माजी विद्यार्थी कृती समितीच्यावतीने रविवारी (दि. २५) विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात शिवमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती डॉ. प्रवीण कोडोलीकर, डॉ.चांगदेव बंडगर यांनी दिली.




रविवारी सायंकाळी ५ वाजता कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर शिवपुरस्कार वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात पोलिस अधिकारी गायक अभिजित भोसले, कोमल जनकिया, निशांत गोंधळी, केतकी जमदग्नी, सुरज नाईक, वादक प्रितेश हिवाळे, नृत्यदिग्दर्शक सागर बगाडे, चंद्रकांत पाटील व ओंकार रोटे सादरीकरण करणार आहेत.

शिवमहोत्सवातर्गत शिवाजी परूळेकर यांचा जीवन गौरव व पोलिस अधिकारी अभिजित भोसले यांना शिव-कलागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. विद्यापीठात उत्तम कामगिरी बजावणारे शिक्षक, शिक्षकेत्तर, प्रशासकीय सेवक उपकुलसचिव कॅप्टन डॉ. नितीन सोनजे, डॉ. नंदकुमार मोरे, संदीप पाटील, विजय पाटील, सदानंद माने, मिलिंद सुरूलकर, रवींद्र भोसले यांना शिव-पुरस्कार देण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2018
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात रविवारी 'शिवमहोत्सव'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे रविवारी (दि. २५) सायंकाळी पाच वाजता विद्यापीठातील लोककला केंद्र सभागृहात 'शिवमहोत्सव' होणार आहे. जनता दल (सेक्युलर)चे राज्य महासचिव शिवाजीराव परुळेकर यांना 'जीवनगौरव,' तर पोलीस अधिकारी अभिजित भोसले यांना 'शिव-कला गौरव' पुरस्कार देऊन या वर्षी सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे संकल्पक डॉ. प्रवीण कोडोलीकर व आयोजक समिती सचिव डॉ. चांगदेव बंडगर यांनी शुक्रवारी दिली.

उद्घाटन रविवारी सायंकाळी पाच वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होईल. यानंतर पुरस्कार वितरण होईल. यामध्ये नितीन सोनजे, नंदकुमार मोरे, संदीप पाटील, विजय पाटील, सदानंद माने, मिलिंद सुरुलकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

24 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात रविवारी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे शिवमहोत्सव होणार आहे. त्यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. 'लोकमत'चे आदित्य वेल्हाळ यांनी टिपलेले छायाचित्र.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 FEB 2018 पुढारी



कोल्हापूर : शिवमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई (छाया : पप्पू आत्तार)

24 FEB 2018

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सकाळ'तर्फे ३ मार्चपासून 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी'

## फिझिंगा-संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत मुक्त संवादमालिका : २६ पासून सन्मानिका 'सकाळ' कार्यालयात उपलब्ध

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : जीवनात ध्येयनिश्चिती करून उत्तुंग यश संपादण्यासाठी नवी दृष्टी आणि नवी ऊर्जा देणारा सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सहकार्याने तीन मार्चपासून सलग चार दिवस फिझिंगा-संजय घोडावत ग्रुपप्रस्तुत 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' हा कार्यक्रम होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दररोज सायंकाळी सहा ते आठ या वेळेत संवाद साधण्याची ही पर्वणी सर्वांनाच अनुभवता येणार आहे. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून सोमवार (ता. २६) पासून मोफत सन्मानिका 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगरातील कार्यालयात उपलब्ध होणार आहेत.

जीवनाला कलाटणी देण्यासाठी कोणता तरी आयडॉल अनेकांच्या समोर असतो. जीवनात ध्येय गाठण्यासाठी काही वेळा व्यक्तींची चरित्रे वाचतो किंवा अनुभवतोही, यातून निश्चित जीवनाला दिशा

पान २ वर »



श्रेयस तळपदे | शेखर नाईक | नीलिमा मिश्रा | राकेश देशमुख | राज कांबळे | संदीप पाटील | अमोल यादव

### विद्यापीठाचे विशेष सहकार्य

'ऊर्जा -संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाला चार वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दररोज सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत मुलाखती रंगतील. मोफत सन्मानिकेसह प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था असेल.

### संवादाचे कार्यक्रम असे :

- **तीन मार्च :** प्रसिद्ध अभिनेता **श्रेयस तळपदे**
- **चार मार्च : पद्मश्री शेखर नाईक** (भारतीय अंध क्रिकेट संघाचे माजी कर्णधार), **नीलिमा मिश्रा** (रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या सामाजिक कार्यकर्त्या)
- **पाच मार्च : राकेश देशमुख** (सॉफ्टवेअर क्षेत्रातील प्रसिद्ध तंत्रज्ञ), **राज कांबळे** (प्रसिद्ध जाहिरातकार)
- **सहा मार्च : संदीप पाटील** (आयपीएस, सातारा), **कॅप्टन अमोल यादव** (पायलट व विमाननिर्मितीतील मराठी उद्योजक)

### प्रायोजकांविषयी...

- **सहप्रायोजक :** चाटे शिक्षण समूह, मार्व्हलस् इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, श्री ट्रॅव्हल्स
- **हॉस्पिटॅलिटी पार्टनर :** हॉटेल सयाजी
- **रेडिओ पार्टनर :** रेडिओ सिटी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2018
सकाळ

# 'सकाळ'तर्फे ३ मार्चपासून 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी'

» पान १ वरून

देणारा मार्ग सापडतो. अनेकांनी आपल्या जीवनात यश संपादित करून पायवाट घालून दिलेली असते. त्या पायवाटेवरती चालून ऊर्जा संपादित करून, काहीतरी करण्याची ऊर्मी प्रत्येकाला हवी असते. नेमकी हीच गोष्ट लक्षात घेऊन 'सकाळ'ने तीन वर्षांपूर्वी या अनोख्या उपक्रमाला प्रारंभ केला. बॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथाकार सुभाष घई, प्रसिद्ध अभिनेता अतुल कुलकर्णी, प्रसिद्ध अभिनेता राहुल बोस, सयाजी शिंदे, भारत विकास ग्रुप - बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे हणमंतराव गायकवाड, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, कुशल संघटक प्रदीप लोखंडे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, ग्लोबल वेलनेस ॲम्बॅसिडर रेखा चौधरी, दिग्दर्शक अभिनय देव, फ्लेम युनिव्हर्सिटीचे संस्थापक संचालक पराग शहा, 'व्हेंटिलेटर' चित्रपटाचे दिग्दर्शक राजेश मापुस्कर, दास ऑफशोअरचे अशोक खाडे, विशेष पोलिस महानिरीक्षक कृष्ण प्रकाश यांच्याशी संवाद साधून ऊर्जा दिली. यावर्षीही अशाच नामांकित वक्त्यांशी संवाद साधण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. आजच वेळेचे नियोजन करा आणि तीन ते सहा मार्चची सायंकाळ नवीन ऊर्जा घेऊन जाणारी करूया...! माहितीसाठी सूरज जमादार (९५५२५८१९१८) यांच्याशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
24 FEB 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अचूकतेसाठी हवे संख्याशास्त्र

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'क्रिकेटमधील वाढती गुंतागुंत लक्षात घेता या खेळाला अधिक पारदर्शक व अधिक अचूक बनविण्यासाठी संख्याशास्त्राचा अत्यंत प्रभावी वापर करता येणे शक्य आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ व पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. एम. बी. राजर्षी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित 'स्टॅटिस्टीकल मॉडेलिंग अँड ॲप्लिकेशन्स' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

डॉ. राजर्षी म्हणाले, 'संख्याशास्त्राचे उपयोजन क्रीडा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात करता येणे शक्य आहे. विशेषतः क्रिकेटसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड लोकप्रिय आणि गतिमान झालेल्या खेळाच्या बाबतीत विश्लेषणात्मक अचूकता येण्याच्या दृष्टीने संख्याशास्त्र मोठे योगदान देऊ शकते. क्रिकेटमध्ये सध्या प्रचलित असलेले काही नियम बरेचदा वादग्रस्त ठरतात. त्यात सुधारणा करण्याबरोबरच आणखी नवे विश्लेषणाचे पर्याय देण्याचे काम संख्याशास्त्र निश्चित प्रभावीपणाने करू शकते.'



'स्टॅटिस्टीकल मॉडेलिंग अँड ॲप्लीकेशन्स' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादात बोलताना डॉ. एम. बी. राजर्षी. व्यासपीठावर डॉ. डी. टी. शिर्के याच्यासह मान्यवर.

## डॉ. एम.बी. राजर्षी यांचे विद्यापीठात प्रतिपादन

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी सैद्धांतिक आणि व्यावहारिक आकडेवारीचे शास्त्रीय उपयोजन संख्याशास्त्रात कशा प्रकारे करता येईल, यासंदर्भातील विवेचन केले. यावेळी संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. डी. एन. काशीद यांनी स्वागत केले तर समन्वयक डॉ. एच. व्ही. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सुकुमार राजगुरू यांनी आभार मानले तर डॉ. डी. एम. सकटे यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी संख्याशास्त्रज्ञ डॉ. के. मुरलीधरन, टी.व्ही. रामनाथन्, राहुल गुप्ता, एस. बी. मुनोळी, शारदा भट, ए. एस. तलवार, माजी विभाग प्रमुख डॉ. आर. एन. रट्टीहळ्ळी, डॉ. एस. बी. महाडिक, सोमनाथ पवार, एस. एस. सुतार आदी उपस्थित होते.

जनसपर्क कक्ष
24 FEB 2018 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK revises class improvement rules

Piyush.Bhusari@timesgroup.com

## FEW OF THE CHANGED NORMS



Languages, social science, law, commerce, science, engineering and pharmacy faculties have been included in the revised regulations of the scheme

If a student fails to improve score despite opting for class improvement scheme, he will be able to keep his original score in the final marking system

Students opting for the scheme will not remain eligible for the merit list, scholarship or any other university level award

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has revised the rules for its class improvement scheme.

According to its latest circular, with changing times the varsity has decided to include some major and minor changes in the said scheme. According to Mahesh Kakade, director of SUK's Board of Examinations and Evaluation, some of the changes include expansion of the scheme.

"Earlier the class improvement scheme was available for MA, M.Com and Management faculties only. Now, we have included few more faculties such as engineering, languages, social science, law, and pharmacy," he said.

He added that earlier due to less number of faculties the number of class improvement applications used to be less than 100. But with expansion from this semester, the number might increase.

Talking about the changes, Kakade said, "The major change that we have introduced in the scheme is one related to the marks. Earlier, the student if applied to class improvement scheme, used to get the new marks only, regardless of he/she improved in the exam or not. Now, we have made it more flexible and now if a student fails to improve his/her score, then his earlier marks will be restored in the final scoring."

The circular added that the students opting for the scheme will not remain eligible for the merit list, scholarship or any other university level award.

According to the university officials, not only the few courses that were eligible earlier, but the higher fee also deters students to take up the class improvement scheme even if they want to.

"To register for the class improvement scheme one has to shell out Rs 1,500, and the exam fee will be different according to the course. The scheme is altogether costly for the students of the professional courses, where students have to shell out exam fee of Rs 7,725," stated the circular. The students, according to the circular, will also have to give an undertaking on Rs 100 stamp paper about appearing and applying for the said scheme.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात रेडिओ व्यवस्थापन कार्यशाळा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



'आकाशवाणीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. समाजातील सर्व घटकांना सामावून घेणाऱ्या कार्यक्रमांमुळे आकाशवाणीचा विस्तार सर्वदूर झाला आहे, असे मत कोल्हापूर आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम अधिकारी श्रीपाद कहाळेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र तसेच एमए मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने आयोजित रेडिओ व्यवस्थापन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार होत्या.

कहाळेकर म्हणाले, 'कार्यक्रमांची रचना करत असताना श्रोता कोण, याचा अभ्यास असणे आवश्यक आहे. कोणत्या भागासाठी कार्यक्रम सादर होणार आणि त्या त्या भागाच्या गरजा लक्षात घेऊन कार्यक्रमाचा विषय निश्चित केला जातो. माध्यमांतून विकासाची संकल्पना साकारता येते. विशेषतः ग्रामीण भागात विकास करत असताना लोकांचा सहभाग महत्वाचा असतो. कार्यक्रमात सामाजिक प्रश्नांना स्थान दिले तर लोकसहभाग वाढण्यास मदत होते.'

तत्पूर्वीच्या सत्रात नाट्यलेखक व दिग्दर्शक विद्यासागर अध्यापक यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, माध्यमातून सामाजिक विषय हाताळले तर ही माध्यमे लोकजीवनाचा भाग बनतात. खासगी एफएम वाहिन्यांनीही सामाजिक बांधिलकीची भावना जोपासली असल्याने या वाहिन्यांना लोकमान्यता मिळाली आहे.

24 FEB 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात विज्ञान कथालेखन कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ८ मार्च या कालावधीत विज्ञान कथालेखन कसे करावे, या विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे. ६ मार्चला शिवाजी विद्यापीठामध्ये सकाळी साडेदहा वाजता मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. या कार्यशाळेत डॉ. बाळ फोंडके, प्रा. यशवंत देशपांडे, प्रा. माधुरी शानभाग, प्रा. मोना चिमोटे, प्रा. संजय ढोले आणि प्रा. शिरीष देशपांडे हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव पवार आणि कार्यवाह अ. पां. देशपांडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात रेडिओ व्यवस्थापन कार्यशाळा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



'आकाशवाणीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. समाजातील सर्व घटकांना सामावून घेणाऱ्या कार्यक्रमांमुळे आकाशवाणीचा विस्तार सर्वदूर झाला आहे, असे मत कोल्हापूर आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम अधिकारी श्रीपाद कहाळेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र तसेच एमए मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने आयोजित रेडिओ व्यवस्थापन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार होत्या.

कहाळेकर म्हणाले, 'कार्यक्रमांची रचना करत असताना श्रोता कोण, याचा अभ्यास असणे आवश्यक आहे. कोणत्या भागासाठी कार्यक्रम सादर होणार आणि त्या त्या भागाच्या गरजा लक्षात घेऊन कार्यक्रमाचा विषय निश्चित केला जातो. माध्यमांतून विकासाची संकल्पना साकारता येते. विशेषतः ग्रामीण भागात विकास करत असताना लोकांचा सहभाग महत्वाचा असतो. कार्यक्रमात सामाजिक प्रश्नांना स्थान दिले तर लोकसहभाग वाढण्यास मदत होते.'

तत्पूर्वीच्या सत्रात नाट्यलेखक व दिग्दर्शक विद्यासागर अध्यापक यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, माध्यमातून सामाजिक विषय हाताळले तर ही माध्यमे लोकजीवनाचा भाग बनतात. खासगी एफएम वाहिन्यांनीही सामाजिक बांधिलकीची भावना जोपासली असल्याने या वाहिन्यांना लोकमान्यता मिळाली आहे.

24 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

## विज्ञान कथा लेखन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मराठी विभाग आणि मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने ६ ते ८ मार्च या कालावधीत विज्ञान कथा लेखन कसे करावे, या विषयावर विनामूल्य कार्यशाळा होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक आणि बडोदा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते ६ मार्चला सकाळी साडेदहा वाजता उदघाटन होईल. इच्छुकांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

मटा
घरोघरी

महाराष्ट्र टाइम्स

# बौद्धिक स्तर वाढवणारे लेखन



अभ्यासू विश्लेषण हा कोणत्याही वृत्तपत्राचा पाया असतो. समाजात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांच्या अभ्यासू निरीक्षणातून परामर्श घेणारी बातमीदारी माध्यमांचा श्वास आहे. महाराष्ट्र टाइम्सचा वाचक म्हणून जेव्हा मी विचार करतो तेव्हा मला हे दोन महत्त्वाचे पैलू प्रकर्षाने जाणवतात. मला महाराष्ट्र टाइम्स वाचायला आवडण्यामध्ये हे कारण अग्रक्रमावरचे आहे. 'मटा'मधील सदरे, विषयांची मांडणी, काळानुरूप बदलणारे समाजप्रवाह आग्रहाने, पण तितक्याच समतोलपणे मांडले जातात. युवा, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा प्रत्येक वाचकाला भिडणारे लेखन, विश्लेषण यामुळे 'मटा'चे वाचन हा माझ्या अवांतर वाचनाचा अविभाज्य भाग आहे. विद्यापीठाचा कुलगुरू या दृष्टिकोनातून माझ्यातील वाचक महाराष्ट्र टाइम्ससाठी आतूर असतो. प्रत्येक पिढीशी एक नाते तयार करणाऱ्या बातम्या, लेख महाराष्ट्र टाइम्समध्ये आवर्जून प्रसिद्ध होतात. अंकातील विशेष लेखांपासून रविवारची पुरवणी ही बौद्धिक स्तर वाढवणारी असते.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू